मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहर सुंदरतेने बहरतंय!

## महापालिकेचा 'वेस्ट टू वंडर' हा अभिनव प्रकल्प; कचऱ्यातून कलेचा चमत्कार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अंतर्गत स्वच्छता मोहीम, आर.आर.आर सेंटर, शून्य कचरा प्रकल्प, वेस्ट टू वंडर, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक जीवन शैलीचा स्वीकार, जनजागृती असे अनेक अभिनव प्रयोग राबविले जात आहेत.

महापालिकेचा आरोग्य विभाग शहराच्या सौंदर्यात भर घालणारे उपक्रम सातत्याने राबवत आहे. त्यानुषंगाने अ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक १० अंतर्गत इंदिरानगर, नाना-नानी पार्क, मोरवाडी, म्हाडा कॉलनी, शिवनेरी सोसायटी, अजिंठानगर, सुमन मॉल तसेच एमआयडीसी रोडवरील किशोर पंप कंपनी परिसरात आरोग्य विभागामार्फत 'वेस्ट टू वंडर' हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे.



या उपक्रमांतर्गत कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा वापर करून परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. वापरात नसलेले पाईप, प्लास्टिकच्या बाटल्या, लाकूड, माठ, दगड आदी वस्तूंना कल्पकतेचा स्पर्श देत त्यातून आकर्षक कलाकृती तयार करण्यात आल्या आहेत. विविध रंगसंगती, रेखीव सजावट आणि भिंतींवरील अत्यंत कल्पकतेने रेखाटलेली चित्रांनी या परिसराचा संपूर्ण कायापालट केला आहे. एकेकाळी नागरिकांनी अस्ताव्यस्त टाकलेल्या कचऱ्याची जागा आता नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

> सार्वजनिक जागेवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी तेथे स्वच्छता करून तो परिसर टाकाऊ वस्तूंचा वापर करून कल्पकतेने सजवण्याचा उपक्रम आरोग्य विभागाने हाती घेतला आहे. या अंतर्गत शहरातील विविध सार्वजनिक जागा स्वच्छ व सुंदर करण्यात येत आहेत. नागरिकांनी देखील सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता त्या जागांची स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करण्याची गरज आहे.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी 'अ' क्षेत्रीय सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक स्नेहा चांदणे, सहायक आरोग्य निरीक्षक कृष्णा राऊत तसेच, अन्य महापालिका कर्मचारी यांच्या प्रयत्नांमुळे कचऱ्यातून साकारलेली ही कला शहराच्या सौंदर्यात भर घालत आहे. वेस्ट टू वंडर या अनोख्या उपक्रमामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणे उजळून निघाली आहेत. हा प्रकल्प फक्त कचरा व्यवस्थापनापुरता मर्यादित न राहता, शहराच्या सौंदर्याचे प्रतीक बनत आहे.

---

# पूरग्रस्तांच्या मदतीला महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट सरसावल्या

## सोलापूर जिल्हातील मोहोळ तालुक्यात पूरग्रस्तांसाठी केली भरभरुन मदत

**पिंपरी | प्रतिनीधी**

मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यामध्ये पावसाने धूमाकुळ घातला. अनेकांचे संसार, हातातोंडाला आलेली शेतातील पिके, गुरे-ढोरे पूरामध्ये वाहून गेले. बळीराजाला या संकटातून बाहेर करण्यासाठी सर्वत्र प्रयत्न सुरु आहेत. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातून राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनीही पुढाकार घेतला. सोलापूर जिल्ह्यातील दोन गावांना प्रत्यक्षात जाऊन अन्नधान्यासह, साड्या, ऊबदार कपडे, टॉवेल, बिस्कीटांचे वाटप केले. आम्ही तुमच्या सोबत आहोत असा शाब्दिक आधाराही बळीराजाला दिला.



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात मुंढेवाडी आणि अर्जुनसोंड या ठिकाणी सकाळी एक टेम्पोभरून सर्व साहित्य रवाना करण्यात आले. दोन्ही गावांमध्ये शेतकऱ्यांना या साहित्याचे वाटप केले. यावेळी सोलापूर जिल्ह्याच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा वर्षा शिंदे यांच्यासह इतर महिला पदाधिकारी तसेच महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. पूरग्रस्त नागरिकांना मदत नव्हे तर कर्तव्य आहे, असे म्हणत सामाजिक बांधिलकी जपत प्रा. कविता आल्हाट यांच्यासह कुटूंबियांनी प्रत्यक्षात भेट देऊन साहित्य वाटप केले.

> बळीराजा संकटात अडकलेला आहे. संकटाच्या काळात एकमेंकाना मदतीचा हात देणं, साथ देणं ही आपली संस्कृती आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेकांचे संसार उध्दवस्त झाले आहेत. शेती खरडून गेली आहे. गुरे-ढोरे वाहून गेली त्यांच्या दुखामध्ये खारीचा वाटा उचलण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. असा प्रयत्न सर्वांनी करून बळीराजाला संकटातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करू.
>
> **- प्रा. कविता आल्हाट, राष्ट्रवादी शहराध्यक्षा पिंपरी-चिंचवड.**

# राज्यस्तरीय आरोग्य रँकिंगमध्ये महापालिका पुन्हा अव्वल!

## पिंपरी चिंचवड महापालिकेची आरोग्य क्षेत्रात पाचवी सलग विजयी कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरोग्य मंत्रालयामार्फत राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आरोग्य सेवांची वेळोवेळी तपासणी करून त्यांच्या कार्यप्रदर्शनाच्या आधारे रँकिंग जाहीर केली जाते. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या जुलै व ऑगस्ट २०२५ च्या आरोग्य कार्यक्रमांच्या रँकिंग (MOH RANKING) मध्ये पिंपरी चिंचवड महापालिका प्रथम क्रमांक मिळवत सलग पाचव्यांदा राज्यात अव्वल स्थानी राहिली आहे.

राज्यातील एकूण २७ महानगरपालिकांना मागे टाकत जुलै महिन्यात ४४.८५ गुणांसह पिंपरी चिंचवड महापालिकेने पहिला क्रमांक पटकाविला तर ऑगस्ट ४३.०१ गुण मिळवून पुन्हा आपले प्रथम स्थान अबाधित ठेवले आहे.

या रँकिंगमध्ये मातृत्व आरोग्य, बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य, पीसीपीएनडीटी, आरसीएच पोर्टल, आयडीएसपी, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, रेबीज नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, डेंग्यू व मलेरिया नियंत्रण, असंसर्गजन्य आजार नियंत्रण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मानांकन, ई-औषधी, मोफत निदान सेवा, आयुष्मान भारत-आरोग्य व आरोग्य कल्याण केंद्रे, एचआयव्हीएस, आशा कार्यक्रम तसेच प्रशासन व वित्तीय व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या निर्देशकांचा समावेश होता. या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने राज्यातील इतर महानगरपालिकांवर आघाडी घेतली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या यशामुळे पुन्हा एकदा हे अधोरेखित झाले आहे की, सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच आरोग्यसेवेत उत्तम कामगिरी साधता येते.




> ही रँकिंग केवळ आकडेवारी नाही तर आपल्या कार्यसंस्कृतीची आणि आरोग्य सेवेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची पावती आहे. नागरिकाभिमुख धोरणे, सातत्यपूर्ण तपासणी, लसीकरण, महिलांचे व बालकांचे आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवर नियंत्रण यामध्ये आम्ही सातत्याने लक्ष केंद्रित केले आहे.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> वैद्यकीय विभागाने गेल्या काळात तब्बल पाच वेळा राज्यस्तरावर पहिला क्रमांक पटकावला आहे. आरोग्य सेवा पोहोचवताना प्रत्येक स्तरावर काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांपासून रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांपर्यंत सर्वांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे. ही राज्यस्तरीय कामगिरी शहरातील प्रत्येकासाठी अभिमानाची आहे. आगामी काळात आणखी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपण ही कामगिरी टिकवून ठेवू असा आम्हाला विश्वास आहे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महापालिका.**

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रमात 783 तक्रारींचे निवारण

## उपक्रमासाठी महापालिका आणि शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर चंद्रभागा पांडुरंग जगताप यांच्या पुढाकाराने थेरगाव येथे राबविण्यात आलेल्या "आमदार आपल्या दारी – संवाद, सेवा, समर्पण" या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात ७८३ नागरिकांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण करण्यात आले, तर अनेक तक्रारींवर तत्काळ कार्यवाही सुरू करण्यात आली.



थेरगावमधील सोनाई मंगल कार्यालय येथे गुरुवारी (दि. ९ ऑक्टोबर) आयोजित या शिबिरात प्रभाग क्रमांक 23 आणि 24 मधील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शासन आणि प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचवणे हेच खरे जनसेवेचे उदाहरण आहे, असे आमदार जगताप यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमात शासकीय योजना, दाखले, रेशनकार्ड, वीज, पाणी, ड्रेनेज, आरोग्य, पर्यावरण, वाहतूक तसेच महापालिकेशी संबंधित विविध तक्रारींवर तत्काळ निर्णय घेण्यात आले. नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आमदार जगताप यांनी थेट सूचना दिल्या.

उपक्रमासाठी महापालिका आणि शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात नायब तहसीलदार मदन जोगदंड, मंडळ अधिकारी विष्णू भोसले, बाबासाहेब साळुंखे, अश्विनी गायकवाड, तलाठी एच.एम. चांदेकर, सचिनानंद माहुनकर, नवनाथ मोरे, साहेबराव थोरात, सुदर्शन पाटील, संजय गांधी निराधार योजनेचे प्रकाश भोंडवे, महावितरणचे कार्यकारी अभियंता मुंडे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मधुकर थोरात, पर्यावरण विभागाचे सोहन निकम, आरोग्य विभागाचे दरवडे, विद्युत विभागाचे शेळके, जलनिस्सारण विभागाचे मोमीन, नगररचना विभागाचे महेश तावरे, पाणीपुरवठा विभागाचे बरिदे, स्थापत्य विभागाचे हेमंत देसाई, बांधकाम परवानगी विभागाचे विजय सोनवणे, ग विभागाचे क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावर तसेच काळेवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बहिरट आदी अधिकारी उपस्थित होते.

आमदार जगताप यांच्यासोबत नगरसेवक संदीप गाडे, नगरसेविका मनीषा पवार, अभिषेक बारणे, तानाजी बारणे तसेच पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे ७८३ नागरिकांच्या तक्रारींना प्रत्यक्ष प्रतिसाद मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी "आमदार आपल्या दारी" हा उपक्रम खऱ्या अर्थाने जनसेवा आणि प्रशासनातील पारदर्शकतेचे उदाहरण ठरल्याचे समाधान व्यक्त केले.

# पुण्यातील कर्वेनगर भागातील अतिक्रमणे काढली!

## महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पावले उचलली

**पुणे | प्रतिनिधी**

कर्वेनगर भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील अतिक्रमणांवर महापालिका प्रशासनाने कारवाई करून हा चौक मोकळा केला. पोलीस बंदोबस्तात महापालिकेच्या पथ, बांधकाम तसेच अतिक्रमण विभागाने संयुक्तपणे ही कारवाई केली. या कारवाईमध्ये बेकायदा टपऱ्या, कमानी, तसेच बेकायदा बांधकामांवर कारवाई करून मोठ्या प्रमाणात राडारोडा काढून टाकण्यात आला.





बेकायदा पार्किंग, चौकांमध्ये अनधिकृत दुकाने यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याचे समोर आले होते. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पावले उचलली आहेत. गेल्या तीन दिवसांपासून बेकायदा जाहिरात फलकांवर कारवाई करून चौक रिकामे करण्यात येत आहेत.

महापालिकेचा पथ, बांधकाम आणि अतिक्रमण विभागाने शुक्रवारी सकाळी पोलिसांच्या मदतीने कर्वेनगर परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील अतिक्रमणांवर कारवाई केली. या कारवाईत खाद्यपदार्थांचे स्टॉल, टपऱ्या, यांसह राजकीय मंडळींनी तात्पुरत्या स्वरूपात उभारलेली बेकायदा कार्यालये, कमानी, काढून टाकण्यात आल्या.

या कारवाईमुळे येथे मोठ्या प्रमाणात राडारोडा जमा झाला होता. हा राडारोडादेखील महापालिकेने काढून टाकला. या कारवाईनंतर पुन्हा या चौकात अतिक्रमणे होणार नाहीत, यासाठी आवश्यक ती काळजी महापालिकेच्या वतीने घेतली जाणार आहे. तसेच, या भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अडथळा ठरत असलेली भिंत काढली जाणार असल्याचे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

गेल्या आठवड्यात आयुक्त राम यांनी महापालिकेच्या विविध विभागांच्या प्रमुखांची बैठक घेतली होती. या बैठकीत वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने शहरातील प्रमुख ३२ रस्ते आणि वाहतूक कोंडी होणाऱ्या २२ ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या पथ विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून कोंडीची कारणे काय आहेत, याचा अहवाल सादर केला. त्यानंतर महापालिकेने वाहतूक कोंडीला जबाबदार असलेल्या घटकांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना सुरू केली.

> “ पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिलेल्या आदेशानंतर महापालिकेच्या अभियंत्यांनी या परिसराची पाहणी केली होती. त्यानंतर अतिक्रमणे काढून घेण्यासाठी सर्वांना नोटिसा बजाविण्यात आल्या होत्या. त्यानंतरही अतिक्रमणे काढून न घेतल्याने ही कारवाई करण्यात आली. कारवाईमध्ये अतिक्रमणे, राडारोडा हटवून १० हजार चौरसमीटर जागा मोकळी करण्यात आली आहे.
>
> **– अनिरुद्ध पावसकर मुख्य अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका.**

# महापालिकेच्या 90 शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणार

## चार कोटींच्या पूर्वगणक पत्राला मान्यता; 91 शाळांमध्ये बसवले 852 सीसीटीव्ही

**पुणे | प्रतिनीधी**

महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेच्या सर्व 300 शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात सुमारे 91 शाळांमध्ये 862 सीसीटीव्ही बसविण्यात आले असून त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात 90 शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी चार कोटी रुपयांच्या पूर्वगणक पत्रकाला मान्यता देण्यात आली आहे.

बदलापूरमध्ये शाळेत विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे राज्यभर खळबळ उडाली होती. या घटनेची गंभीर दखल घेत शासनाने राज्यातील प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही लावण्याचा आदेश दिला होता. पुणे महापालिकेच्या शहराच्या जुन्या हद्दीसह समाविष्ट 32 गावांत मिळून सुमारे 300 शाळा आहेत.

विद्युत विभाग आणि शिक्षण विभागाने एकत्रितपणे सर्व शाळांचे सर्वेक्षण केले. शाळेच्या इमारतीमध्ये किती खोल्या आहेत, किती मजले आहेत, मोकळी जागा, प्रवेशद्वार किती आहेत याची पाहणी केली. त्यानुसार या सर्व इमारतींमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. याच्या पहिल्या टप्प्यात 91 शाळांमध्ये 862 सीसीटीव्ही बसवण्यात आले असून आता आणखी 90 शाळांमध्ये 4 कोटी रुपये खर्च करून नव्याने सीसीटीव्ही बसवले जाणार आहे. यानंतर देखली 150 शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम बाकी राहणार असून तेथे देखील टप्प्या-टप्प्याने सीसीटीव्ही बसविले जाणार असल्याची माहिती, विद्युत विभागाच्या प्रमुख मनीषा शेकटकर यांनी दिली.



### गैरप्रकार रोखण्याचा प्रकार

शहरात महापालिकेच्या सुमारे 300हून अधिक शाळा आहेत. सुमारे दीडशे इमारतींमध्ये त्या भरतात. काही शाळांना मोठी मैदानेही आहेत. तेथे सुरक्षारक्षक नेमले असले तरी त्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे शाळांच्या परिसरात कचरा टाकणे, शाळेतील साहित्य चोरणे, मैदानात रात्रीच्या वेळी मद्यपी तसेच नशेखोरांचा वावर असणे, गुन्हेगारी कृत्य करणे अशा प्रकारांचा समावेश आहे. त्यामुळे शाळांचे नुकसान टाळणे, तसेच हे गैरप्रकार रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात येत आहेत.

### मुलींच्या शाळांना प्राधान्य

» खासगी तसेच शासकीय शाळांमध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटना घडलेल्या आहेत. यामध्ये तेथे काम करणारे कर्मचारी, शिक्षक, बसचालक यासह अन्य लोकांकडून मुलींना लक्ष्य केले जाते. त्यामुळे महापालिकेने पहिल्या टप्प्यात प्राधान्याने सीसीटीव्ही बसविण्यासाठी मुलींच्या शाळांची निवड केली आहे.

# पीएमआरडीएमध्ये आणखी 163 गावांची भर

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विस्तार; लवकरच जवळपास 900 गावे पीएमआरडीएअंतर्गत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात सध्या 697 गावांचा समावेश आहे. मात्र, त्यात आता नव्याने जवळपास 163 गावांची भर पडणार आहे. बारामती आणि पुरंदर हे दोन संपूर्ण गावे प्राधिकरणाशी जोडले जाणार आहेत. त्यामुळे पीएमआरडी अंतर्गत जवळपास 900 गावांचा भार पडणार आहे. त्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला असून, शासनाकडून अंतिम निर्णय होणार आहे.

पीएमआरडीएअंतर्गत 9 तालुक्यांचा समावेश आहे. त्यात पुणे आणि पिंपरी चिंचवडचे शहरे, मावळ, मुळशी, हवेली, तसेच भोर, शिरुर, दौंड, खेड, वेल्हे आणि पुरंदरच्या तालुक्यातील काही निवडक गावांचा समावेश आहे. त्यातील बांधकाम परवानगीसह इतर रस्त्याबाबत पीएमआरडीएचा हातभार असतो. तसेच, सुनियोजित नागरीकरणासह विकासकामांसाठी निधी पीएमआरडीए खर्च करते.

बारामती तालुक्याचे नागरिकरण वाढले आहे. तसेच, पुरंदरचा तालुक्यातील काही गावात कामे, नियोजन करण्यास अडचणी येत असल्याने संपूर्ण पुरंदरचा समावेश करण्याबाबत हालचाली सुरू आहेत. तर, बारामतीदेखील पीएमआरडीएमध्ये समावेशाची मागणी आहे. पुणे शहरालगत असलेल्या या दोन तालुक्यांचा विकास होणे अपेक्षित असताना ही गावे निश्चित करण्यात आली आहेत.




**बारामतीचे 113 तर पुरंदरची 50 गावे जोडणार**

बारामती तालुक्यात जवळपास 113 महसुली गावांची नोंद आहे. तर, या ठिकाणी नगर परिषद व नगरपंचायतदेखील अस्तित्वात आहे. त्यामुळे ती गावे बारामतीमध्ये जोडण्यात यावी, असे नियोजन पीएमआरडीने आखले आहे. तर, वेल्हातील काही गावे पीएमआरडीतून कमी झाली आहेत. पुरंदरच्या 108 गावांपैकी साधारणे 50 गावे समाविष्ट नव्हती. तीदेखील आता जोडली जाणार आहेत.

> बारामती तालुक्यानंतर पुरंदरच्या सर्व गावांचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव आहे. शासनाकडून अंतिम निर्णय झाल्यावरच त्यावर कार्यवाही होईल. पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात गावांची संख्या वाढणार आहे.
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

# फटाका स्टॉलच्या लिलावातून पुणे महापालिका मालामाल!

## फटाक्यांच्या स्टॉल्सच्या ऑनलाइन लिलावातून महापालिकेला मिळाले 83 लाखांचे उत्पन्न

**पुणे | प्रतिनीधी**

दिवाळी सणाच्या निमित्ताने पुणे महापालिका गेल्या तीन वर्षांपासून फटाक्यांच्या स्टॉल्सचे ऑनलाइन लिलाव करत आहे. या वर्षी, महापालिकेने शहरातील १३ ठिकाणी एकूण १९२ फटाक्यांच्या स्टॉल्सचा लिलाव केला. या प्रक्रियेद्वारे एकूण १२५ स्टॉल्सचा लिलाव करण्यात आला, ज्यामुळे एकूण ८३ लाखांचे उत्पन्न मिळाले. यापैकी, शनिवार पेठेतील वर्तक बागेजवळील नदीकाठावर असलेल्या ४० स्टॉल्सना सर्वाधिक बोली लागल्या, ज्यापैकी सर्वाधिक बोली ६९ लाख होती. ऑनलाइन लिलावात, १९२ पैकी ६७ स्टॉल्सचा लिलाव झाला नाही.



### नागरिकांच्या मागण्या..

१. अधिकृतपणे परवानगी घेतलेल्या व्यावसायिकांना तात्काळ स्टॉलसाठी जागा उपलब्ध करून द्यावी.
२. बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेले फटाके स्टॉल त्वरित काढून टाकावेत.
३. जर मनपाकडून नियमाने प्रक्रिया करून शुल्क भरलेल्या व्यावसायिकांना जागा दिली जाणार नसेल, तर त्यांचे शुल्क परत करण्यात यावे.
४. या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

पुणे महापालिका २०२३ पासून फटाक्यांच्या स्टॉल्ससाठी ऑनलाइन लिलाव करत आहे. हा निर्णय फायदेशीर ठरत आहे. या वर्षीही महापालिकेने शहरातील १३ वेगवेगळ्या ठिकाणी १९२ फटाक्यांच्या स्टॉलसाठी ऑनलाइन लिलाव केले. शनिवार पेठ रिव्हरसाईड, कोंढवा खुर्द (अग्निशमन केंद्र), हडपसर, धानोरी, कोथरूड, कात्रज, पर्वती, धायरी, खराडी, बालेवाडी, हडपसर (सीझन मॉल), वारजे (आरएमडी कॉलेज), लोहेगाव आदी ठिकाणी एकूण १९२ स्टॉल्ससाठी लिलाव झाले. यापैकी १२५ फटाक्यांच्या स्टॉलचा लिलाव करण्यात आला. यातून महापालिकेला एकूण ८३ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. गेल्या वर्षीपेक्षा हे प्रमाण जास्त आहे, असे महापालिका प्रशासनाने सांगितले.

शहराच्या भागात नागरिकांची सुरक्षा म्हणून तसेच इतर ठिकाणी अनधिकृत फटाका स्टॉल लावले जावू नयेत. यासाठी महापालिकेने शहराच्या मुख्य भागासह उपनगरांमध्ये जागा निश्चित केल्या आहेत. त्यानुसार पुणे महापालिकेकडून शहराच्या मुख्य भागासह उपनगरांमध्ये फटाका स्टॉल उभारण्यासाठी लिलाव पध्दत वापरली जाते. लिलावानुसार संबंधित स्टॉल धारकाला पैसे मोजावे लागतात. त्यानुसार नियमित पैसे भरुन त्याला स्टॉल मिळतो. याप्रमाणे पुणे महापालिकेने फटाके विक्रीसाठी निर्धारित नियमांनुसार परवानगी प्रक्रिया सुरू केली असून, त्यासाठी फटाके व्यावसायिकांनी नियमानुसार शुल्क भरून व आवश्यक कागदपत्रे सादर करून आपली प्रक्रिया पूर्ण केली आहे. परंतु परवानाधारक व्यावसायिकांना स्टॉलसाठी जागा देण्यास धरण मालमत्ता विभागाकडून अनावश्यक विलंब केला जात आहे. यामुळे अधिकृत परवानगीधारक व्यावसायिकांना व्यवसाय सुरू करण्यात अडचणी येत आहेत. असा आरोप कॉंग्रेस पक्षाचे वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष करीम शेख यांनी केला आहे.

दरम्यान, शहरातील विविध रस्त्यांवर व फूटपाथवर काही व्यक्तींनी बेकायदेशीरपणे फटाके स्टॉल लावलेले आहेत, ज्यांच्याकडे कोणतीही महापालिकेची परवानगी नाही. यामुळे नियमपालन करणाऱ्या व्यावसायिकांवर अन्याय होत असून, महापालिकेच्या प्रशासनावर नागरिक व व्यापारी वर्गाचा विश्वास कमी होत आहे. याबाबत पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, अनधिकृत फटाका स्टॉल धारकांवर अतिक्रमण विभागाकडून कारवाई केली जाईल, असे सांगितले जात आहे. तर अतिक्रमण विभागाला याबाबत कोणतेही पत्र आले नसल्याचे एका अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे या अनधिकृत फटाका स्टॉलवर नेमके कोण कारवाई करणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.